RPAD

विक्रीकर सहआयुक्त, व्यवसायकर,
नाशिक यांचे कार्यालय,
3 रा मजला,
नाशिक जिल्हा कृषी औदयोगिक सहकारी
संघ लि. इमारत,
व्दारका, नाशिक– 422011.

प्रति,
मा. अध्यक्ष,
असोसिएशन ऑफ द मॅनेजमेंटस् ऑफ अन–एडेड इंजिनिअरिंग कॉलेजेस्,
महाराष्ट्र, व्दारा– के.के. वाघ एज्युकेशन सोसायटी,
अमृतधाम, पंचवटी,
नाशिक–3.

क्र. नाक्षे/विसआ/व्यक/नोंदणी क्रमांक व विवरण/2012.13/ब– 9ll नाशिक,दिनांक. 23/8/2013

विषय – व्यवसायकर नोंदणी क्रमांक व विवरणाबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयानुसार आपणांस कळविण्यात येते की, व्यवसायकर हा महाराष्ट्र शासनाच्या महत्वाच्या महसुलापैकी एक आहे.

व्यवसायकराखाली नोंदणी दोन प्रकारे होते. एक म्हणजे व्यक्ती स्वयंरोजगारीत अथवा व्यवसायकर कायदयाप्रमाणे आवश्यक असल्यास नावनोंदणी दाखला (Profession Tax Enrollment Certificate) घेते. दुसरे असे की, ज्या मालकाकडे (Employer) नोकर असतील व ते व्यवसायकर भरण्यास पात्र असतील तर अशा मालकाला संबधित नोकरांचा व्यवसायकर कपात करून शासकिय कोषागारात भरण्यासाठी नोंदणी दाखला (Profession Tax Registration Certificate) घ्यावा लागतो व नोकरांचा कर कपात करून तो Online भरावा लागतो व विहीत कालावधीची विवरणपत्रे Online दाखल करावी लागतात.

पहिल्या प्रकारात व्यक्तींचा व्यवसायकर नावनोंदणी क्रमांक (TIN) 99 पासून सुरु होतो व तो 11 अंकी असतो व शेवटी कॅपिटल P असतो. अशा व्यक्तींनी संबधित आर्थिक वर्षाच्या 30 जुन पूर्वी व्यवसायकर भरणा MTR 6 चलनात करणे आवश्यक आहे.

Association of the Managements of Un-Aided Engg Colleges (Mah.)
10 SEP 2013
Inward No. 209
File No.
Initial Bhoye.

(कृ.मा.प)

श्री. ... P. discuss

दुस–या प्रकारात मालक येतात. आपल्या संस्थेची अनेक सदस्य शाळा व महाविदयालये कार्यरत आहेत व ही शाळा व महाविदयालये व्यवसायकर कायदयाखाली मालक (Employer) म्हणून नोंदीत आहेत. मात्र दुर्दैवाने असे सांगावेसे वाटते की, बहुतेक शाळा महाविदयालये व्यवसायकर कायदयाच्या तरतुदींविषयी अनभिज्ञ / उदासिन दिसून येतात व Online विवरणपत्रे व Online payments करीत नाहीत, जे कायदयाने बंधनकारक आहे व रू. 1000 / – प्रतिविवरणपत्र लेट फीस पात्र आहेत.

तसेच व्यवसायकर कायदयाखाली www.mahavat.gov.in या वेबसाईटवर Know your TIN मधून नवीन TIN कमांक उपलब्ध आहेत. मात्र बहुतेक शाळा व महाविदयालये व्यवसायकराचे जुने कमांक वापरतांना दिसून येतात हे कायदयास अनुसरून नाही.

नावनोंदणी दाखला (PTEC) व नोंदणीदाखलाधारक (PTRC) मालकांनी आपले PAN किंवा TAN नोंदविणे बंधनकारक आहे. यासाठी आपली माहिती अदययावत करण्यासाठी "PT INFORMATION FORM" विभागाच्या वेबसाईट www.mahavat.gov.in वर उपलब्ध आहे. Download —> Forms—> Electronic Forms—> PT Information Form. सदर फॉर्म तात्काळ उपरोल्लिखित वेबसाईटवर e - Services —> PT - Info - Upload मधुन अपलोड करावा व पोचपावतीची प्रत ठेवावी.

कोणत्याही कायदयाबद्दलचे अज्ञान (देशात राबविल्या जाणा–या) क्षमेस पात्र धरले जात नाही. यामुळे प्रत्येक शाळा व महाविदयालयांस त्यांच्या काही अडचणी असतील तर त्यांचे कार्य क्षेत्रातील व्यवसायकर अधिकारी यांचेशी संपर्क साधावा व आपले शंका निरसन करून घ्यावे.

[redacted] व्यवसायकर कायदा, नियम, सक्युलर्स, नोटीफिकेशन्स विकीकर विभागाच्या www.mahavat.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेत याची कृपया नोंद घ्यावी.

वरील दृष्टीकोनातून योग्य ती कार्यवाही व्हावी, जेणेकरून महाराष्ट्र शासनाच्या व्यवसायकर कायदयाची प्रभावी अंमलबजावणी होईल यात शंका नाही.

विकीकर सहआयुक्त, व्यवसायकर,
नाशिक क्षेत्र, नाशिक.